**महाराष्ट्र विधानसभा**
**तिसरे अधिवेशन, २०२५**
**---------------------------**
**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १९, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

**-------------------------------------**
**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**
**-------------------------------------**

**मुंबईतील वर्सोवा येथील क्रिस्टल पॉईंट मॉल, स्टार बाजार, लिंक रोड, अंधेरी (पश्चिम) येथे विकासकाने केलेले बेकायदेशीर बांधकाम**

**(१) * १७४८८ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वर्सोवा येथील क्रिस्टल पॉईंट मॉल, स्टार बाजार, लिंक रोड, अंधेरी (पश्चिम) या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकासकाने बेकायदेशीर बांधकाम व विनापरवाना संरचनात्मक बदल केले असून सदर जागेचा वापर मंजूर आराखड्याच्या व पर्यायाने चटई निर्देशांक (FSI) व विकास नियंत्रण नियमावलीचे (DCR) उल्लंघन करून केला जात असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने अनधिकृत बांधकाम,संरचनात्मक बदल, सामायिक मार्गिका व मुक्त जागेवर अतिक्रमण केल्याप्रकरणी जागृत महाराष्ट्र न्यूज या संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त व प्रमुख अभियंता (विकास नियोजन ) के/पश्चिम, अंधेरी विभाग यांना कारवाई करण्याबाबत दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अहवालानुसार सदर मिळकतीवरील बांधकामाबाबत जागृत महाराष्ट्र न्यूज यांच्यामार्फत दि. १६/०५/२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाली होती.

सदर प्रकरणी यापूर्वी सन २०१६ मध्ये सदर मिळकतीवरील अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली होती. त्याअनुषंगाने महापालिकेस बांधकाम नियमितीकरणाचा प्रस्ताव प्राप्त झाला होता व त्यानुसार महापालिकेने दि.२४/०९/२०१६ रोजी नियमितीकरणाचे प्रस्तावास मंजूरी दिली आहे.

तरी, आता सदर प्रकरणी महापालिकेस प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने पुन्हा स्थळ निरिक्षण करुन मंजूर आराखडयाव्यतिरिक्त अनधिकृत बांधकाम आढळल्यास त्यानुषंगाने महापालिकेद्वारे नियमानुसार कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील महानगरपालिका शाळांचे खाजगीकरण करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२) * १६१४४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका शाळांचे खाजगीकरण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड (पश्चिम) मालवणी येथील महानगरपालिकेची टाऊनशिप शाळा साहस फाऊंडेशन या खाजगी संस्थेला चालविण्यासाठी देण्याच्या निर्णया विरोधात दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास पालकांनी आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर शाळेचे खाजगीकरण तातडीने मागे घेण्याबाबत तसेच मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

साहस फाऊंडेशन या संस्थेस कोणतीही शाळा चालविण्यास देण्यात आलेली नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालवणी येथील शाळेमध्ये पीपीपी तत्वावर खाजगी संस्थेमार्फत शिक्षकांची नियुक्ती करण्याकरीता प्रयास या संस्थेला दिलेल्या परवानगी विरुध्द पालकांनी दि. २३ ऑगस्ट,२०२५ रोजी आंदोलन केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून नियमबाह्यरित्या टोल वसूल करण्यात येत असल्याबाबत

**(३) * १५८७५ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२५' अंतर्गत मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि शिवडी–न्हावाशेवा (अटल सेतू) या प्रमुख महामार्गांवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानंतरही माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत या महामार्गांवरील टोल नाक्यांवर इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून टोल वसुली सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून नियमबाह्यरित्या टोल वसूल करणाऱ्या टोल कंत्राटदारांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

समृद्धी महामार्ग व मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व शिवडी न्हावाशेवा (अटल सेतू) हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अखत्यारित येते. पथकर वसुली अथवा पथकर सूट शासनामार्फत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेप्रमाणे केली जाते. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ दि.२३.५.२०२५ रोजी शासनामार्फत जाहीर झाल्यानंतर त्यासंबंधी शासन अधिसूचना निर्गमित करण्याच्या दृष्टीने महामंडळ / प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रचलित शासन कार्यपद्धतीनुसार अटल सेतूसाठी दि.२१.०८.२०२५ रोजी, मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग व समृद्धी महामार्ग करिता दि.२२.०८.२०२५ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्या व प्रत्यक्षात इलेक्ट्रिक वाहनांना वर नमूद महामार्गावर १००% टोलमाफी लागू करण्यात आली.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाढवण (जि. पालघर) बंदर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाबाबत

**(४) * १७७९६ श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वाढवण बंदर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग फ्रेट कॉरिडॉर या नाशिक जिल्हयातील चांदवड येथे जोडणा-या प्रकल्पास राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाकरिता किती खर्च अपेक्षित आहे व सदर प्रकल्पाचे काम कोणत्या कंपनीमार्फत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचा निधी कशा प्रकारे उभारण्यात येणार आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :**(१) अंशत: खरे आहे,

वाढवण बंदर (तवा) ते महाराष्ट्र समृध्दी महामार्ग (भरवीर) जोडणारा फ्रेट कॉरिडॉर महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास, प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनाच्या खर्चास दि.०५.०८.२०२५ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात येऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सद्यस्थितीमध्ये भूसंपादनासाठी हुडको या वित्तीय संस्थेमार्फत कर्ज उभारण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर सुसाध्यता तपासून प्रकल्प खर्चाच्या निधीबाबत नियोजन करण्यात येईल. प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्यापासून अंदाजे ३ वर्षामध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील पिंपरी-चिंचवड येथील काळेवाडी रहाटणी परिसरात नियमबाह्य सुरु असलेल्या दारु दुकानांचे परवाने रद्द करण्याबाबत

**(५) * १८९७९ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पिंपरी-चिंचवड येथे काळेवाडी-रहाटणी परिसरात सह्याद्री सहकारी गृहरचना संस्थेच्या 'ए' बिल्डिंगमधील पूर्णत्वाचा दाखला नसलेल्या व्यापारी गाळयांमध्ये 'कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट' सुरू करण्यासाठी विकासकाकडून घेतलेल्या ना-हरकतीचा आधार घेत "विक्रांत वाईन शॉप" या दारू विक्री दुकानाला नियमबाह्यरित्या परवानगी देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवतीर्थ सहकारी गृहरचना संस्थेच्या गेटजवळ असलेल्या "बजाज देशी दारू दुकान (CL-III 300)" आणि "विक्रांत वाईन शॉप" येथून दारू घेणारे नागरिक सोसायटीच्या गेटसमोर, फुटपाथवर, उघड्यावर मद्यपान करीत असल्यामुळे परिसरातील युवती व महिलांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोसायटीतील महिला, भगिनी किंवा वॉचमन यांनी या गैरप्रकारांबाबत दारू दुकानांकडे अथवा संबंधित व्यक्तींना तक्रार केल्यास शिवीगाळ करणे, त्यांना अयोग्य व लज्जास्पद वागणूक दिल्याचे आरोप केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, “विक्रांत वाईन शॉप” व “बजाज देशी दारू दुकान (CL-III 300)” यांचे परवाने रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर दारू दुकाने तातडीने बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

सह्याद्री सहकारी गृहरचना संस्था, रहाटणी, पुणे यांनी “विक्रांत वाईन शॉप” (FL-2) या दारु दुकानामुळे होणाऱ्या त्रासामुळे सदर दारू दुकान कायमस्वरुपी बंद करण्याबाबत दिनांक १२.०४.२०२५ रोजी तक्रार केली आहे. सदर तक्रारीमध्ये दारु दुकानाला सोसायटीची ना-हरकत नसल्याचे तसेच, बिल्डरकडून “कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट” चालू करणार असल्याचे सांगून ना-हरकत घेतल्याचे नमूद आहे.

(२) होय, हे खरे आहे.

शिवतीर्थ सहकारी गृहरचना संघ मर्यादित रहाटणी, पुणे यांनी बजाज देशी दारु दुकान (CL-3) व विक्रांत वाईन्स शॉप (FL-2) या दुकानांमुळे इतर शेजारील सोसायटींमधील रहिवाशांना त्रास होत असल्याने ही दुकाने कायमस्वरुपी बंद करणेबाबत तक्रार अर्ज दिला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदरच्या दारु दुकानामुळे महिलांना त्रास होत असल्याचे सोसायटीमार्फत तक्रार करण्यात आली आहे. तथापि, सोसायटीतील महिलांना वाईनशॉप मधील लोकांकडून शिवीगाळ व लज्जास्पद वागणूक दिलेबाबत संबंधित काळेवाडी पोलीस ठाणे, पिंपरी-चिंचवड येथे तक्रार दाखल नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) (i) बजाज देशी दारू दुकान (CL-3) या अनुज्ञप्तीच्या जागेवरील बांधकाम अनधिकृत स्वरुपाचे असल्याने जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक २८.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर अनुज्ञप्ती योग्य जागी स्थलांतर होईपर्यंत निलंबित केली आहे.

(ii) विक्रांत वाईन शॉप (FL-2) ही अनुज्ञप्ती स्थित असलेली इमारत अधिकृत असून सदर इमारतीमधील विक्रांत वाईन्स या अनुज्ञप्तीच्या जागेस बांधकाम पूर्णत्वाचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. सदर अनुज्ञप्तीविरुद्ध प्राप्त तक्रार अर्ज व महानगरपालिकेचा अहवाल यात संदिग्धता असल्याने सर्व संबंधितांची जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे दिनांक ०४.१२.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असुन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.यापूर्वी विक्रांत वाईन शॉप (FL-2) या अनुज्ञप्तीवर नियमभंग केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक ०४.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये रुपये ५०,०००/- दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(iii) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत नियमभंग प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. त्याअनुषंगाने विषयांकित विक्रांत वाईन शॉप (FL-2) व बजाज देशी दारू दुकान (CL-3) या दोन दारुविक्री दुकानांच्या परिसरात गेल्या वर्षभरामध्ये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ ई, ६८, ८४ व ८५ अन्वये एकूण २० गुन्हे दाखल असून त्यामध्ये ५० आरोपी आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याबाबत

**(६) * १५६९२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सातही धरणातील पाणीसाठा यंदा ९८ टक्क्यापर्यंत पोहोचला असला तरी मुंबईची सद्याची दैनंदिन पाण्याची गरज ४५०० ते ४६०० दक्षलक्ष लिटरवर पोहोचली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील वर्षी मे महिन्यात पाणी कपातीची किंवा राखीव साठयावर अवलंबून रहावे लागणार असल्याची बाब महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १३ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात वाढत्या नवीन बांधकामामुळे दररोज ३८०० दक्षलक्ष लिटरवरुन ४१०० दक्षलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येऊनही नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मुंबईतील वाढते गृहनिर्माण प्रकल्प आणि वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईतील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने प्रलंबित गारगाई, पिंजाळ व दमनगंगा प्रकल्पाचे काम मार्गी लावून पुर्ण करणे व अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याच्या दृष्टीने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या एकूण सात धरणांमधून १४ लाख ४७ हजार ३६३ दश लक्ष लिटर इतका पाणीसाठा मंजूर असून दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सुमारे ९२% इतका जलसाठा उपलब्ध आहे. एकूण लोकसंख्येचा विचार करता दैनंदिन ४६६५ दश लक्ष लिटर इतकी पाणीपुरवठ्याची आवश्यकता आहे.

(२) महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागामार्फत दरवर्षी पावसाळ्यानंतर एकूण उपलब्ध पाणीसाठा, मागणी यांचा विचार करून पाणीपुरवठ्याचे धोरण निश्चित करण्यात येते.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात सुरू असणारी पायाभूत सुविधा विकासाची कामे व रहिवासी बांधकामे यामुळे लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. सदर होणारी वाढ व उपलब्ध पाणीसाठा यामुळे काही वेळा पाणीपुरवठ्याच्या टोकाचे व उंच डोंगराळ भागातील रहिवाशांना कमी दाबाने पाणीपुरवठा होऊ शकतो. मात्र अशा जागी महानगरपालिकेमार्फत अंतर्गत झडपा मध्ये बदल करून आणि आवश्यक त्या उंच डोंगराळ भागासाठी उदंचन केंद्रांमार्फत आवश्यक तो पाणीपुरवठा करण्याचे काम नियमितपणे करण्यात येते

(४) गारगाई प्रकल्प- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्प विभागाने प्रस्तावित गारगाई धरणाचे काम हाती घेतले असून, प्राथमिक अभियांत्रिकीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. सदर प्रकल्पाच्या मसुदा निविदा बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पिंजाळ प्रकल्प- प्रस्तावित पिंजाळ धरण विकसित करण्यासाठी प्राथमिक अभियांत्रिकीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे पर्यावरणीय परिणाम निर्धारण अभ्यासास प्राथमिक मंजूरी मिळाल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम हाती घेण्यात येत आहे.
दमनगंगा पिंजाळ प्रकल्प- केंद्र शासनाचे जलसंपदा, नदीविकास व गंगा पूनरुत्थान मंत्रालय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प विकसित करण्याबाबत आवश्यक मान्यता करार करण्यासंदर्भातील कार्यवाही विविध स्तरावर सुरु आहे. याव्यतिरिक्त अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याच्या दृष्टीने २०० द.ल.लि. (विस्तारित ४०० द.ल.लि.) प्रतिदिन क्षमतेचे निःक्षारीकरण प्रकल्पाचे व कुलाबा येथे सदर प्रकल्प कार्यान्वित करुन पिण्यायोग्य पाणी बनविण्यासाठी १२ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या "उन्नत तृतीय स्तराधारित जलशुध्दीकरण प्रकल्पाचे" काम मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अन्न व औषध प्रशासनाला दुकाने व कंपन्यांमध्ये तपासणी दरम्यान कफ सिरपची बनावट औषधे आढळल्याबाबत

**(७) * १५५९१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व),श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने हाती घेतलेल्या कफ सिरप मोहिमेदरम्यान औषध दुकाने व कंपन्यांमधील तपासणीत बनावट, निकृष्ट दर्जाचे किंवा प्रतिबंधित औषधे आढळल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्रीस मनाई असताना देखील औषधांच्या दुकांनामध्ये औषध विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात बृहन्मुंबई विभागात शासनाने ९७ ठिकाणी तपासणी केली असता त्यापैकी ३५ जणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बंदी घालण्यात आलेल्या औषधांमुळे यकृत, मूत्रपिंड, ह्दय व मज्जासंस्थेवर दुष्परिणाम होत असून महाराष्ट्रासह ६ राज्यांमध्ये १३ बालकांचा कोल्ड्रीफ सिरपमधील डीईजी घटकामुळे किडनी निकामी झाल्याने मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बंदी घातलेल्या औषधांचे घटक व संयोजनात किरकोळ बदल करुन तिच औषधे नव्या नावाने आणि पँकिगसह पुन्हा विक्रीसाठी बाजारात आणली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर बनावट औषधे राज्यातील तसेच परराज्यांतील काही कंपन्या अनधिकृत विक्रेत्यांमार्फत शासकीय रुग्णालयांना पुरवठा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) तसेच, विभागात एकूण २०० मंजूर औषध निरिक्षक पदापैकी १९५ पदे (९७.५ %) रिक्त असल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये नियमित औषध तपासणी व नियंत्रणाची कामे ठप्प झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, औषधे तपासणीसाठी राज्यात केवळ नागपूर, नाशिक व पुणे या तीनच ठिकाणी प्रयोगशाळा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(९) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासह औषध निरीक्षकांची रिक्त पदे भरणे, औषध नियंत्रणप्रणाली अधिक सक्षम करणे, बनावट औषधे निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे परवाने रद्द करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) राज्यात विना प्रिस्क्रिप्शन कफ सिरपची विक्री बाबत पडताळणी मोहिम घेण्यात आली. या तपासणीमध्ये विना प्रिस्क्रिप्शन औषध विक्री करणाऱ्या परवानेधारकांविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमांच्या उल्लंघनाबाबत कारवाई करण्यात आलेली आहे. या तपासणीत बनावट, निकृष्ट दर्जाचे किंवा प्रतिबंधित औषधे आढळून आली नाहीत.
(२) विनाप्रिस्क्रिप्शन मोहिमेदरम्यान अशा प्रकारे विक्री होत असल्याचे आढळून आले आहे.
(३) बृहन्मुंबई विभागात तपासणी मोहिमेमध्ये एकूण ९७ औषध विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यातील ३८ प्रकरणात विना प्रिस्क्रिप्शन कफ सिरपची विक्री करण्यात आलेल्या औषध विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येवून ३८ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.
(४) कोल्ड्रीफ कफ सिरप मधील DEG घटकामुळे लहान मुलांचा मृत्यू झाल्याची बाब मध्यप्रदेश राज्यात निदर्शनास आली आहे. तथापि महाराष्ट्र राज्यात या औषधांचा पुरवठा किंवा वापर झालेला नाही.
(५) हे खरे नाही.

(६) अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहिमेअंतर्गत राज्यातील शासकीय रुग्णालयामधून कफ सिरपचे ७ नमुने चाचणी व विश्लेषणासाठी अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा यांच्याकडे पाठविले असून सदर नमुन्यांचा चाचणी अहवाल प्रयोगशाळेकडून अद्यापही प्राप्त झालेला नाही.

(७) राज्यात औषध निरीक्षकांच्या एकूण २०० मंजूर पदांपैकी १५५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे १०९ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि.२६.०७.२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तथापि, अन्न व औषध प्रशासनामार्फत उपलब्ध मनुष्यबळाद्वारे नियमित औषध तपासणी व नियंत्रणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(८) औषधे तपासणीसाठी राज्यात मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या तीन ठिकाणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच नाशिक व पुणे याठिकाणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(९) उत्पादक व विक्रेते यांच्या तपासण्या करून दोषींचे परवाने निलंबन/रददची कारवाई करण्यात येते. औषध निरीक्षक यांची १०९ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि. २९/०७/२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुषंगाने दिनांक २२/०३/२०२६ रोजी चाळणी परीक्षा आयोजित केली आहे.

औषध निरीक्षकांद्वारे नियमितपणे ठराविक इष्टांकानुसार नमुने विश्लेषणार्थ घेण्यात येतात व अप्रमाणित/बनावट औषधांवर प्रशासकीय तसेच न्यायालयीन कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात धान खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(८) * १५६२९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि. गोंदिया) तालुक्यात शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रांमार्फत धान खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे प्रकार मागील काही हंगामात सातत्याने उघडकीस आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीनुसार केंद्र चालक व व्यापाऱ्यांनी मिळून तोतया शेतकरी दाखवून तब्बल सहा कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा घोटाळा केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सालेकसा तालुक्यास बोनस स्वरूपात वितरीत करण्यात आलेल्या २२ कोटी ७५ लाख १५ हजार ६०० रुपयांपैकी सुमारे ६ कोटी रुपये तोतया लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित केंद्र चालक आणि व्यापारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, भविष्यात अशा प्रकारची अनियमितता पुन्हा होऊ नये म्हणून शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये समृध्द किसान शेती उद्योग साधन सामुग्री व खरेदी विक्री सेवा सह. संस्थेमार्फत अनियमितता केल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदर संस्थेवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक तपास, आर्थिक गुन्हे शाखा, गोंदिया यांच्याकडून सुरु आहे. संस्थेच्या सर्व संचालक मंडळाच्या मालमत्तेवर मुल्यांकन प्रमाणपत्रानुसार शासकीय रकमेचा बोजा चढविण्यात आला आहे.

(२) व (३) हे अंशत:   खरे आहे.
जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे प्राप्त तक्रारीनुसार तहसिलदार, सालकेसा यांच्या अध्यक्षेतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार पणन हंगाम २०२४ - २५ मध्ये प्रोत्साहनपर राशीत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.
४) जिल्हा पणन अधिकारी यांनी दोषी आढळलेल्या सर्व १३ खरेदी केंद्राना दंड ठोठावला आहे. तसेच अदा केलेली रक्कम शासनजमा करण्यास नोटिस बजावली आहे. त्यानुसार  १३ पैकी ९ संस्थानी रु.७०.०५ लक्ष रक्कम शासनजमा केली आहे. उर्वरित रक्कम वसुल करण्याची कार्यवाही जिल्हा पणन अधिकारी यांचेकडून सुरु आहे. तपासणी समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे दोषी संस्थांवर कठोर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.  जिल्ह्यातील इतर खरेदी संस्थांची देखिल तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.
(५) पणन हंगाम २०२५-२६ पासुन शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करताना आधार क्रमांक, ७/१२ उतारे, ई महाभुमीवरील ई-पिकपेरा इत्यादी तपासुन नोंदणी करण्याची प्रक्रिया कार्यान्वित आहे.

-----------------

**वसई - विरार महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या गावांना भोगवटा प्रमाणपत्राअभावी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्याबाबत.**

**(९) * १६७४९   श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई -विरार महानगरपलिका क्षेत्रातील भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या इमारतींना न्यायालयाच्या आदेशान्वये महानगरपालिकेकडून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीतील रहिवाश्यांना टँकरच्या माध्यमातून पाण्याची उपलब्धता करावी लागत असल्याने अधिकचा भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिढ्यानपिढ्या रहिवाशी असलेल्या गावातील स्थानिक लोकांना केवळ ती गावे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट झाल्याने भोगवटा प्रमाणपत्राअभावी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नाकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या इमारतीतील आणि गावातील रहिवाश्यांना महानगरपालिकेकडून घरपट्टी आकारण्यात येत असून इतर नागरी सुविधा देखील पुरविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नियमितपणे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणे हा नागरिकांचा मुलभूत अधिकार असल्याचे निरिक्षण (रिट याचिका ७४०४/२०२४) तसेच वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात अंतर्भुत असलेल्या गावांना पाणीपुरवठा करावा असा आदेश (जनहीत याचिका ८१/२०१३) मुंबई उच्च न्यायालयाने दोन वेगवेगळ्या याचिकांच्या सुनावणी दरम्यान दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, वसई -विरार क्षेत्रातील भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या इमारतीतील तसेच महानगरपालिकेत समाविष्ट होण्याआधीपासून ग्रामपंचायतीची घरपट्टी भरत असलेल्या नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या पाहता त्यांना नियमितपणे पाण्याची उपलब्धता होण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे : (**१) हे खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १७ डिसेंबर २०२४ रोजीच्या निर्णयानुसार तसेच, नगरविकास विभाग परिपत्रक दि. २५ एप्रिल, २०२५ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या इमारतींना नळजोडण्या मंजूर करण्यात येत नाहीत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १७ डिसेंबर, २०२४ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणी भारतातील सर्व शासकीय सेवा सुविधा पुरविणाऱ्या संस्थांना लागू आहे. त्यामुळे केवळ महानगरपालिकेत समाविष्ट झाल्याने गावातील स्थानिक लोकांना भोगवटा प्रमाणपत्राअभावी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (नळजोडण्या मंजूर) करण्यात येत नाही ही बाब खरी नाही.

(४) हे खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१७ डिसेंबर, २०२४ रोजी दिलेल्या निर्णयापूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील सर्व नागरी व ग्रामीण भागातील मालमत्तांना कर आकारणी केली असून, पायाभूत सेवा-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत व त्या आजपावेतो देण्यात येत आहेत.

(५) हे खरे नाही.

• मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका ७४०४/२०२४ ही कुळगाव-बदलापुर नगरपरिषदेशी संबंधीत आहे. सदर याचिकेत वसई-विरार शहर महानगरपालिका प्रतिवादी नसून न्यायालयाने सदर प्रकरणात वसई-विरार शहर महानगरपालिकेस कोणतेही निर्देश दिलेले नाही.

• मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल जनहीत याचिका ८१/२०१३ प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच, मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिलेल्या निर्णयात वसई-विरार शहर महानगरपालिकेशी संदर्भात कोणतेही आदेश / निर्देश नाहीत.

• तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत दि. २५ एप्रिल, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नाही अशा मालमत्ता अथवा बांधकामांना महानगरपालिकेमार्फत नवीन नळजोडण्या मंजूर करण्यात येत नाहीत.

६) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याच्या समस्यांबाबत शासन धोरणानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यांना जोडणाऱ्या राज्य महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(१०) * १५६१४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड व घनसावंगी (जि. जालना) तालुक्यांना जोडणाऱ्या राज्यमार्ग क्रमांक ६१ वर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघाताचा धोका निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याचे काम माहे एप्रिल, २०२४ पासून सुरू झाल्याचे दाखवून प्रत्यक्षात गेल्या पाच महिन्यांत केवळ नाममात्र काम झाले असल्याचे स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यावरून रोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहने व शेतमाल वाहतूक होत असताना खड्ड्यांमुळे वाहतुकीत अडथळा, अपघातांची भीती व आपत्कालीन सेवांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून डांबरीकरणाच्या कामांसाठी संबंधित विभागास समन्वय साधून कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त, भाग (१) ते (४) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

पाचोड–अंबड–घनसावंगी-आष्टी (रामा-६१) सा.क्र. कि.मी. १२१/६३० ते १९९/१०० सदर रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युइटी योजने अंतर्गत पूर्ण झालेले असून पाचोड ते घनसावंगी सा.क्र. कि.मी. १२१/६३० ते १६८/०० पर्यंतची लांबी वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. सदर रस्ता डिसेंबर, २०२१ पासून पुढील १० वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्तीसाठी असुन सन २०२५ च्या अतिवृष्टीत या लांबीत पडलेले खड्डे उद्योजकाकडून भरण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही,

सदर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालू असून सदर रस्त्यावरील अतिवृष्टीमुळे खराब झालेली रस्त्याची दुरुस्ती करण्याचे काम उद्योजकाकडून सुरु करण्यात आलेले असून हे काम जानेवारी, २०२६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि. अहिल्यानगर) शहरातील फर्निचर गोदामाला लागलेल्या आगीत पाच जणांचा झालेला मृत्यू

**(११) * १९१३८ श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि. अहिल्यानगर) शहरातील कालिका फर्निचरच्या गोदामाला दिनांक १७ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील पाच जणांचा गुदमरून मृत्यू झाला असल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगीचे कारण, प्रशासनातील त्रुटी व जबाबदार व्यक्ती याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पीडित कुटुंबास आर्थिक मदत देण्यासाठी, आगीस जबाबदार असणा-यांवर कारवाई करण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे,

नेवासा (जि. अहिल्यानगर) शहरातील कालिका फर्निचरच्या गोदामाला दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी आग लागली.

(२) व (३) सदर घटनेच्या अनुषंगाने विद्युत निरीक्षक, विद्युत निरिक्षण विभाग, अहिल्यानगर यांच्या दि.१२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या तपासणी अहवालानुसार आगीचे कारण शॉर्ट सर्किट आहे.

नेवासा नगरपंचायतीच्या अग्निशमन विभागाकरीता १ अग्निशमन वाहन उपलब्ध असून, बाह्यस्त्रोताद्वारे १ वाहनचालक व १ प्रशिक्षित फायरमन कार्यरत आहे.

भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) नियम, २०२४ नुसार उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील ठाकूर व्हिलेज, समता नगर या ठिकाणी विकासकाने इमारतीच्या उभारणीची कामे प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(१२) * १६४०३ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील ठाकूर व्हिलेज, समता नगर येथील एस.डी. कार्पोरेशन या विकासकाने टोलेजंग इमारत उभारणीसाठी नागरिकांकडून बुकिंगच्या नावाखाली सन २०२२ मध्ये लाखो रुपये घेऊनही अद्यापपर्यंत इमारतीच्या उभारणीची कामे पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्याप इमारती उभारण्यात आल्या नसल्याने लाभार्थ्यांनी विचारणा केली असता त्यांना उर्मटपणे उत्तरे दिली जात असल्याने संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरुन विकासकाच्या कार्यालयासमोर दिनांक २७ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करणा-या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) समता नगर वसाहतीच्या पुनर्विकासामधील पुनर्वसन (भागश:) व विक्री करीता बहुमजली इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. यामध्ये विक्री सदनिकांकरीता १,१५२ निवासी व ७७ अनिवासी भोगवटा प्रमाणपत्र म्हाडामार्फत जारी करण्यात आले आहे. अत्यल्प उत्पन्न गटाच्या २९६, अल्प उत्पन्न गटाच्या १,४८८ व मध्यम उत्पन्न गटाच्या ४० अशा एकूण १,८२४ पुनर्वसन सदनिकांकरिता भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

तथापि, समता नगर वसाहतीच्या पुनर्विकासामधील विक्री सदनिकासंदर्भात म्हाडा कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव - बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद प्रशासन योजनेची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरल्याबाबत

**(१३) * १८३०८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरता यावा यासाठी चार महिन्यांपूर्वी अभय योजना लागू करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ मालमत्ता कर व शास्तीबाबतचा सॉफ्टवेअरमधील डेटा उपलब्ध होत नसल्याने या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात कुळगाव- बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद प्रशासन अपयशी ठरल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुळगाव- बदलापूर येथील हजारो मालमत्ताधारकही शास्ती माफीच्या फायद्यापासून वंचित राहिले असून त्यांना सवलत देण्याची मागणी मा.मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त मालमत्ता कर व शास्तीबाबतचा सॉफ्टवेअरमधील डेटा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) (३) (४) नगरपालिका/नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन कर वसूल करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अभय योजना राबविण्याबाबत दि.१९/०५/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार नगरपरिषदेने ठराव पारित करून थकीत एकत्रित मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केला असून जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर क्षेत्रातील अन्न निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) * १८४०७ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर क्षेत्रात सणासुदीच्या विशेषतः दिवाळीच्या काळात मिठाई, दूध, तेल, तूप, मावा, मसाले, साखर आदी खाद्यपदार्थांमध्ये भेसळीचे प्रमाण वाढल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसारख्या महानगरात लाखो खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या तपासणीचे काम केवळ सहा अन्न निरीक्षकांमार्फत पार पाडले जात असून मोठया प्रमाणावर पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने मुंबईतील अन्न निरीक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ : (**१) राज्यात सणासुदीच्या पार्श्वभूमीवर “सण महाराष्ट्राचा संकल्प अन्न सुरक्षिततेचा” हे अभियान दि.११.०८.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ या कालावधीत राबविण्यात आले. सदर कालावधीत अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयाने एकूण ३४१ अन्न आस्थापनांची तपासणी करून २३७ आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावून ८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

उक्त कालावधीत एकूण ३०९ अन्न नमुने घेण्यात आले असून त्यापैकी २१४ नमुन्यांचे अहवाल प्राप्त आहेत. त्यापैकी १९३ अन्न नमुने प्रमाणित असून १९ अन्न नमुने कमी दर्जाचे तर २ अन्न नमुने असुरक्षित घोषित झाले आहेत. कमी दर्जाच्या अन्न नमुन्यांच्या अनुषंगाने न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात येत असून २ असुरक्षित अन्न नमुने प्रकरणी न्यायालयीन खटले दाखल करण्यात येत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयात अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गात एकूण ४९ मंजूर पदे असून त्यापैकी ४८ पदे भरलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर नगरपरिषदेच्या नवीन इमारतीच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(१५) * १६६०६ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथे दोन ते तीन हजार प्रति चौरस फूट बांधकामाचे दर असताना पालघर नगरपरिषदेच्या नवीन इमारतीचे बांधकाम तब्बल ९ हजार ७५४ रुपये प्रतिचौरस फूट दराने ठेकेदारास दिले असून त्यासाठी शासनाने नगरविकास विभागाच्या वैशिष्टयपूर्ण कामासाठीच्या योजनेतून निधी मंजूर केला असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नगरपरिषदेच्या ३२ हजार ८३३ चौ.फूट.बांधकामासाठी तब्बल २३ कोटी ७२ लाख ३३ हजार ७०१ इतका जास्त खर्च होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन मान्य कंत्राटदारांना काम न देता ते पालघरमधील वास्तुविशारद यांना नियम डावलून तसेच बदलापूर येथील एका खाजगी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे काम स्टर्लिंग इंजिनियर अँड कंन्स्ट्रक्शन एएलपी यांना देण्यात आल्याचे व त्यापोटी कंपनीला रुपये ६ कोटी इतके देयक देखील नगरपरिषदेने मंजूर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरचे काम तात्काळ स्थगित करुन आणि संबंधित अधिकारी, पदाधिकारी व ठेकेदारांविरुध्द कारवाई करावी तसेच या आर्थिक घोटाळयाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने जबाबदार दोषी अधिकारी, पदाधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पालघर नगरपरिषद प्रशासकीय इमारत बांधणे या कामास वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत शासनाकडून रु.२८ कोटी निधी मंजूर झाला आहे. अंदाजपत्रकानुसार निव्वळ बांधकामाचा खर्च (स्थापत्य विषयक कामे) रु.१५,१७,१२,९८३/- इतका आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकात स्थापत्यविषयक कामांच्या बाबी अंतर्भुत असल्याने त्याची गणना चौरस फुटानुसार नसून राज्य दर सूचीमधील दरानुसार आहे.
(२) नगर रचना विभागाच्या बांधकाम परवानगीनुसार बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ३०९९.१८ चौरस मीटर इतके आहे. मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी दिलेल्या तांत्रिक मंजुरीनुसार रु.२७,९७,८४,८०९/- इतका खर्च अपेक्षित आहे.
(३) पालघर नगरपरिषदेच्या कामाच्या निविदेची सूचना दि.११/०९/२०२४ च्या दै.लोकसत्ता व दै.इंडियन एक्स्प्रेस या वृत्तपत्रांमध्ये तसेच शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. ठेकेदार मे.स्टर्लिंग इंजीनिरिंग अँड कन्स्ट्रक्शन्स एल.एल.पी., पालघर यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांच्या कामाला मंजुरी देऊन दि.०४/१०/२०२४ अन्वये आदेश देण्यात आले.

पालघर नगरपरिषदेच्या विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजूरी, कामाचे पर्यवेक्षण करणे इ. करिता तांत्रिकदृष्ट्या सक्षम संस्थेची निवड करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार मे.अतुल कुडतरकर अँन्ड असोसिएटस्, बदलापूर या संस्थेची दि.२६/०६/२०२३ अन्वये निवड करण्यात आली आहे.
(४) (५) (६) मे.स्टर्लिंग इंजिनिअरींग कन्स्ट्रक्शन एलएलपी या ठेकेदाराचे दर सर्वात कमी असल्याने त्यांच्या कामाला मंजुरी देऊन दि.०४/१०/२०२४ अन्वये आदेश देण्यात आले आहेत. ठेकेदाराने केलेल्या कामाचे वेळोवेळी शासकीय तंत्र निकेतन, मुंबई या शासनमान्य संस्थेकडून त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण झाले आहे. काम सुस्थितीत असल्याबाबत संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच ठेकेदार यांनी केलेल्या कामाचे एकुण रु.१०,६९,००,०३६/- इतके देयक अदा करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केज व अंबाजोगाई (जि.बीड) शहरांसाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करण्याबाबत

**(१६) * १६२०४ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८–डी पाटोदा ते अहमदपूर हा महामार्ग केज व अंबाजोगाई शहराच्या मध्यभागातून जात असून सदर महामार्गावर अवजड वाहनांसह ग्रामीण भागातील वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ होत असल्याने शहरात वाहतूक कोंडी व अपघातांच्या घटना वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केज व अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करावा या मागणीसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे दिनांक १ जुलै, २०२५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बायपास रस्ता मंजुरीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वरील पाटोदा ते अहमदपूर या लांबींचे काम केंद्र शासनाची स्टेट एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत पूर्ण करण्यात आले आहे व सद्यस्थितीत या पूर्ण केलेल्या रस्त्याचा दोषदायित्व कालावधी सुरू आहे. आंबेजोगाई व केज शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे ही वस्तुस्थिती आहे. या लांबीमध्ये अपघातांच्या घटना घडत असून झालेले अपघात हे निष्काळजीपणे, भरधाव वेगाने वाहन चालवणे, वाहनांवरील ताबा सुटणे इत्यादी कारणांमुळे झाल्याचे दिसून येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी दि.०१.०७.२०२५ रोजी दिलेल्या निवेदनामध्ये केज शहरास नवीन बायपास मंजूर करण्याची मागणी केलेली आहे. सदर निवेदनामध्ये आंबेजोगाई शहरासाठी नवीन बायपासच्या मागणीचा उल्लेख दिसून येत नाही.

(३) आंबेजोगाई ते मांजरसुबा या दोन लेनच्या रस्त्याचे चौपदरीकरण करणे व केज शहरास बायपास करण्याच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचे सन २०२५-२६ वार्षिक आराखड्यामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे व सद्यस्थितीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबत निविदा प्रक्रिया केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवलीतील (जि.ठाणे) खंबाळपाडा परिसरात साप चावल्याने दोन महिलांचा रुग्णालयात झालेला मृत्यू

**(१७) * १६८१२ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीतील (जि.ठाणे) खंबाळपाडा परिसरात रात्रीच्या वेळी साप चावल्याने कुमारी प्राणवी व तिची मावशी कुमारी श्रुती ठाकुर यांना केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील डॉक्टरांनी दोघांचीही तब्बेत व्यवस्थित असल्याचे सांगितले, तथापि एका तासाच्या उपचारानंतर दोघींची तब्बेत अचानक बिघडल्यामुळे डॉक्टरांनी दुस-या रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातून हलवण्यापूर्वी प्रवेशद्वारात दोघींचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी मृत व्यक्तींच्या पालकांनी केडीएमसी आरोग्य विभागात ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन हलगर्जीपणास जबाबदार असणाऱ्या डॉक्टर व रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सर्पदंश नंतर कु. प्राणवी भोईर हिला प्रथम स.०५.२७ वा. व त्यानंतर थोड्याच वेळात ०५.३३ वा. कु. श्रृती ठाकुर यांना उपचाराकरिता शास्त्रीनगर रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.

कु. प्राणवी भोईर हिची परिस्थिती चिंताजनक वाटत असल्याने शास्त्रीनगर रुग्णालयातील PICU मध्ये कार्यरत बालरोग तज्ञांचा सल्ला घेण्यात आला. रूग्णाला व्हेंटीलेटरची आवश्यकता असल्याने सिव्हिल हॉस्पीटल, ठाणे येथे संदर्भित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कु.श्रृती ठाकुर यांना अतिदक्षता विभागात निरीक्षणासाठी ठेवण्याची आवश्यकता वाटल्याने सिव्हिल हॉस्पीटल, ठाणे येथे संदर्भित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दोन्ही रुग्णांना शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेमधून सकाळी ६.४५वाजता सिव्हिल हॉस्पीटल ठाणे येथे एकत्रित संदर्भित करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

कु.प्राणवी भोईर हिचा दिनांक २८.०९.२०२५ रोजी व कु.श्रृती ठाकुर यांचा दि.३०.०९.२०२५ रोजी सिव्हिल हॉस्पीटल, ठाणे येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त-१, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली. सदर समितीने चौकशीअंती प्राथमिक अहवाल सादर केला आहे.

सदर अहवालामध्ये चौकशी समितीच्या शिफारसी नुसार,

१. डॉ. संजय जाधव, कायम वैद्यकीय अधिकारी यांना आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे दि.०६.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

२. श्रीम. शारदा गोडसे, सिस्टर इन्चार्ज यांना निलंबित करण्यात आले आहे.

३.श्री. आशीष कांबळे, कोविड कालावधीतील वॉर्डबॉय, यांना कामावर येण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

४. PICU येथील वैद्यकीय अधिकारी यांनी डॉ. सौम्या झा यांना बालरोगतज्ञाशी बोलून मोबाईल फोनवरून मार्गदर्शन केले. डॉ. रियाज खान, PICU येथिल RMO सबंधित PICU ज्या संस्थेमार्फत सुरू आहे. त्या संस्थेनी अशाप्रसंगी त्यांनी व त्यांचे कर्मचारी यांनी सर्वप्रकारे सहकार्य करणे आवश्यक असल्याने सदर संस्थेच्या ऑक्टोंबर, 2025 या महिन्याच्या देयकातील 50 टक्के रक्कम दंड म्हणून कपात करण्याबाबत चौकशी समितीने शिफारस केली आहे. तसेच, शास्त्रीनगर

NICU व PICU या दोन्हींचे सखोल ऑडीट करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्त, कल्याण डोंबिवली यांनी दिल्या असून त्या बाबत कार्यवाही सुरू आहे.

५. डॉ. योगेश चौधरी, मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे पर्यवेक्षकीय काम परिणामकारकपणे पार न पाडल्याने एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर कोणताही परिणाम न होता तात्पुरती थांबविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील आंबेगाव बुद्रुक येथील**
**विकास आराखड्यातील कामांबाबत**

**(१८) * १७९६५ श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव बुद्रुक उंड्री,पिसोळी, येवलेवाडी,आंबेगाव बु , आंबेगाव खुर्द, वडाचीवाडी या भागातील अनेक तलाव,जलस्त्रोत आणि बंधारे तसेच सदर गावे सन सन १९९७ साली अंशतः आणि सन २०१७ साली पूर्णतःपुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ साली येथील अंतिम विकास आराखडा मंजूर करण्यात आला असून सदरची गावे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर हे तलाव अथवा बंधारे महानगरपालिकेने ताब्यात घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर आराखड्यातील स.न.३९ व स.नं १५-१६ तसेच इतर अनेक डीपी रस्ते महानगरपालिका अद्याप करू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या रस्त्यांच्या विकासाबाबत नगरविकास मंत्री यांच्यासह अतिरिक्त मुख्य सचिव यांनी देखील महानगरपालिकेला निदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये उप विभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (लघु पाटबंधारे) उप विभाग, हवेली यांचे मार्फत दि. ११/०१/२०२४ रोजी उंड्री, पिसोळी, वडाचीवाडी, येवलेवाडी कोंढवा इ. तलाव हस्तांतरित करण्यात आलेले आहेत.

(२) सदरचे तलाव पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेले असले तरी अद्याप तलावांच्या हद्दी निश्चित करून मिळालेल्या नाहीत.

सन २०१७ मध्ये उंड्री, पिसोळी, वडाची वाडी, येवलेवाडी कोंढवा ई. गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत झालेला आहे. या अनुषंगाने सदर गावांमधील पाझर तलाव जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागामार्फत पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित केले आहेत. नवीन समाविष्ट गावांमध्ये उपविभागीय जल संधारण अधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार दि. ११/०१/२०२४ च्या नुसार २० तलाव आहेत. तथापि सदर तलावांची हद्द निश्चित झाली नसल्याने सदर तलावांचे सांडवे दुरुस्त करणे, अनधिकृत बांधकाम व राडारोडा पडू नये याची काळजी घेणे या कारणासाठी प्रथम सर्व तलावांची हद्द निश्चित करून सदर तलाव संरक्षित करणे क्रमप्राप्त आहे. हद्द निश्चित करणे करिता उप आयुक्त मालमत्ता व व्यवस्थापन पुणे

महानगरपालिके कार्यालय यांचे दि.३०/०५/२०२५ तसेच दि.०३/११/२०२५ रोजीच्या पत्रा द्वारे जिल्हा अधिक्षक, भूमी अभीलेख विभाग, पुणे ०६ यांचेकडे मोजणी करून मिळणेसाठी मोजणी शुल्क भरणे बाबत, प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत तलावांच्या हद्दी निश्चित करणे कामी मोजणी करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

आंबेगाव बु.स.नं.३९ मध्ये मान्य विकास आराखडयानुसार १२ मी. व १८ मी. रूंदीचे डि.पी. रस्ते दर्शविले आहे. त्यापैकी विंडसर काऊंटी येथील १८ मी. डी.पी. रस्त्यापैकी ९ मी. रूंदीचे रस्त्याचे पथ विभाग पुणे महानगपालिकेमार्फत निविदेतील काम सुरू आहे व १२ मी. रूंद डी.पी. रस्त्याची जागा ताब्यात आली नाही. तसेच आंबेगाव बु. स.नं. २८,२९ मध्ये चितांमणी ज्ञानपीठ शाळेकडे हायवेवरून जाणा-या १८ मी. डी.पी. रस्त्याचे अस्तित्वातील ९ मी. रूंदीच्या रस्त्याचे काम सुरू आहे. तथापि आंबेगाव (बु) स.नं.१५,१६ मधील रस्त्याचे जागेचा ताबा पुणे मनपाकडे नाही व सदर स.नं.१५,१६ भागाचा विकास आराखडा अद्याप अंतिम झालेला नाही.

(४) होय.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत वालीव येथे करण्यात आलेले अवैध बांधकाम

**(१९) * १६८०२ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वालीवमध्ये दोन मोठया अवैध शेडच्या बांधकामांवर थेट कारवाई करण्याचे आदेश आयुक्त यांनी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यास आग्रही असताना अतिक्रमण विभागातील लिपिकाकडून आयुक्तांच्या आदेशाचे पालन केले नसल्याची घटना दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ वा त्या सुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध बांधकामांना संरक्षण देणाऱ्या जबाबदार कर्मचाऱ्यांवर तसेच सदर अनधिकृत बांधकाम त्वरीत निष्कासित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दि.१८ सप्टेंबर, २०२५ रोजी गाव मौजे खैरपाडा स.नं.८०, हि.नं.अ/५/१ अनधिकृत बांधकाम आर.सी.सी. कॉलम, पत्रा वीट बांधकामाचे गोडाऊन अंदाजे क्षेत्रफळ १०,००० चौ.फुट जे.सी.बी. व पोकलेन च्या सहाय्याने निष्कासित करण्यात आलेले आहे.

(३) अनधिकृत बांधकाम निष्कासित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील सूत्रकार गावातील बेंडगपाडा येथे रस्ता व काळू नदीवर पूल बांधण्याबाबत

**(२०) * १७२९६ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील सूत्रकार गावातील बेंडगपाडा येथे सुमारे ५५० ते ६०० लोकसंख्या असून, पावसाळ्यात दळणवळणाची सर्व साधने पूर्णपणे ठप्प होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळू नदीच्या पलीकडे वसलेल्या या वस्तीत जाण्यासाठी एकमेव पायवाट असल्याने पावसाळ्यात हा मार्ग चिखल व वाहत्या पाण्यामुळे धोकादायक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेंडगपाडा ते काटेलपाडा या सुमारे अडीच ते तीन किलोमीटर अंतरावरील कच्च्या रस्त्यावरून जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळा आणि इतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काळू नदीवर पूल बांधून मिळावा या स्थानिकांच्या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली केली वा करण्यात येत आहे .

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे. तथापि, सदर रस्त्यावरुन विद्यार्थी व स्थानिक लोकांची रहदारी सुरु आहे.

(४) तलासरी तालुक्यातील सूत्रकार गावातील बेंडगपाडा रस्ता गावांतर्गत रस्ता असल्याने जिल्हा परिषदेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि, सदर नदीचे पात्र २०० मीटर रुंद असल्यामुळे सदर ठिकाणी मोठया पुलाची आवश्यकता असल्याचे नमूद करुन, सदर पुलाबाबत जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. उक्त पत्राच्या अनुषंगाने शहानीशा करुन, निधी उपलब्धततेनुसार व अग्रक्रमानुसार सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील भूखंडांसाठीच्या निविदा प्रक्रियेला विकासकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याबाबत

**(२१) * १७३६० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील ६४ आरक्षित भूखंडांवरील ५८,१८२ झोपड्यांच्या पुनर्विकासाला शासनाने मंजुरी दिली असताना, त्यापैकी २६ भूखंडांसाठीच्या निविदा प्रक्रियेला विकासकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवनार, गोवंडी यांसारख्या भागांतील भूखंडांवर अतिक्रमणांचे प्रमाण जास्त असल्यामुळे आणि ते 'फायदेशीर' (viable) नसल्यामुळे विकासक स्वारस्य दाखवत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सारख्या विशिष्ट प्रकल्पांसाठी 'झोपु' योजनेच्या (SRA) नियमांमध्ये किंवा अटींमध्ये सवलत शासन देणार आहे काय,
(४) असल्यास, ज्या २१ योजनांसाठी विकासक निश्चित झाले आहेत, त्या प्रकल्पांच्या कामाची सद्यस्थिती काय आहे आणि हे प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत,
(५) तसेच उर्वरित २६ भूखंडांसाठीच्या निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळावा, यासाठी महानगरपालिकेला मुदतवाढ द्यावी लागली असून ही मुदतवाढ देऊनही विकासक न मिळाल्यास या भूखंडांवरील हजारो झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी शासन कोणती पर्यायी योजना करणार आहे,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४अन्वये आणि दि.२८ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेया मालकीच्या ६४ झोपडपट्टी पुनर्वसन करीता बृहन्मुंबई महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून निश्चित करण्यात आले आहे. ६४ झोपडपट्टी योजनांकरीता विकासकांमार्फत स्वारस्यता मागविण्यात आल्या असून २१ योजनांना प्रतिसाद प्राप्त झाला आहे.उर्वरीत बहूतांश योजना या देवनार,गोवंडी येथील झोपड्यांची घनता जास्त प्रमाणात अतिक्रमित असल्यामुळे विकासकांकडून प्रतिसाद प्राप्त नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर ६४ झोपडपट्टी पुनर्वसनाची योजना राबविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.
(४) ६४ झोपट्पट्टी पुनर्वसन योजनांखालील क्षेत्राच्या पुनर्विकासाकरिता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.त्यापैकी २१ योजनांना प्रतिसाद मिळाला आहे.त्यानुसार अधिक जमीन अधिमुल्य आणि अनर्जित उत्पन्न अदा करणा-या विकासकास संबधित झो.पु.योजनेचा पुनर्विकास करण्याबाबत स्विकृती पत्र देण्याबाबत महानगरपालिकेच्या स्तरावरून कार्यवाही सुरू आहे. योजनेच्या क्षेत्राफळानुसार आगामी ३-५ वर्षांपर्यंत पुर्ण कालावधी अपेक्षित आहे.
(५) एकल विकासक एका-एका योजनेचा पुनर्विकास करण्याकरीता स्वारस्य दाखवत नसल्याने सदरहू जमिनींचा पुनर्विकास करण्याकरीता समुह पुनविकास योजना राबविण्याच्या शक्यतेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अँटॉपहिल परिसरातील काही दुग्धालयांमध्ये चीज ॲनालॉग पदार्थांची पनीर म्हणून विक्री केली जात असल्याबाबत

**(२२) * १९५०७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजु**

**तोडसाम (अर्णी), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण नियमानुसार देशात "चीज ॲनालॉग" या उत्पादनाच्या विक्रीस कठोर नियम असून उत्पादनात खरे चीज नसल्यास त्यावर "चीज ॲनालॉग" असे स्पष्ट लेबल लावणे तसेच अन्न पदार्थांमध्ये असलेले घटक नमूद करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "चीज ॲनालॉग" हे दुधाऐवजी दुधाची पावडर, हलक्या प्रतीचे पामतेल व विविध केमिकल्स यांच्या मिश्रणातून तयार केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील अँटॉपहिल या परिसरातील काही दुग्धालयांमध्ये "चीज ॲनालॉग" पदार्थांची "पनीर" म्हणून विक्री केली जात असल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट व बनावट पनीर विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच भविष्यात अशा बनावट पनीर विक्रीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे .

महाराष्ट्र राज्यात १ एप्रिल २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत चीज ॲनालॉगचे एकूण १९ अन्ननमुने घेण्यात आले असुन त्यापैकी १४ अन्ननमुने प्रमाणित घोषित झाले असुन १ नमूना असुरक्षित घोषित झाला आहे. सदर अन्ननमूना फेरविश्लेषणसाठी रेफरल प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आला असुन त्याचा अहवाल प्रलंबित आहे. तसेच, ४ अन्न नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

(३) व (४)

दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईतील अँटॉप हिल या परिसरात मे. कौशल्या डेअरी फूड, सुभाष नगर, दिघा, नवी मुंबई या आस्थापनेचे वाहन क्र. MH ०५- FJ ०६५० तसेच, मे. ओम कोल्ड ड्रिंक हाउस, जी.टी.बी. नगर, सायन कोळीवाडा, अँटॉप हिल, मुंबई या आस्थापानंमधून cheese analogue या अन्न पदार्थाचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. सदर अन्न पदार्थाच्या वेष्टनावर कोणतेही लेबल मजकूर आढळून आले नाही. Cheese analogue हे नाशवंत असल्याने व त्याचा पनीर म्हणून वापर होऊ नये या उद्देशाने सदर cheese analogue चा उर्वरित साठा (वजन २१८ किलो, किंमत रु.५४६२५/-) जप्त करून तत्काळ नष्ट करण्यात आला होता. उपरोक्त नमूद दोन्ही अन्न नमुने हे मानकानुसार असल्याने अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांनी प्रमाणित घोषित केले आहेत. विनालेबल cheese analogue चे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, विक्री प्रकरणी संबंधित आस्थापनांविरुद्ध न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात येत आहे.

मे. श्री. गणेश डेअरी, जी.टी.बी. नगर, सायन कोळीवाडा, अँटॉप हिल, मुंबई या आस्थापनेची तपासणी करून १) medium fat paneer २) cheese analogue या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. उपरोक्त दोन्ही अन्न नमुने हे प्रमाणित असल्याचे अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांनी त्यांच्या दि.१३.०९.२०२५ रोजीच्या अहवालानुसार घोषित केले आहे.

५) अन्न व औषध प्रशासनातर्फे पनीर, चीज ॲनालॉग या अन्न पदार्थाचे उत्पादक, विक्रेते यांची नियमित तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येत आहेत. तसेच, अन्न व्यवसायिकांच्या कार्यशाळा घेऊन त्यांना पनीर ऐवजी cheese analague चा वापर करत असल्यास त्याबाबत मेनूकार्ड मध्ये उल्लेख करण्याबाबत दि.०९.०४.२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली (FSSAI) यांनी analogue in dairy context ह्या उत्पादनांना दुग्धजन्य पदार्थांपासून स्पष्टपणे वेगळे करण्यासाठी "ॲनालॉग इन डेअरी कंटेक्स्ट" असे वेगळे लेबल लावण्यासाठी नियमन जारी केलेले आहेत. सदर नियमनामध्ये प्राधिकरणाकडून काही बदल सुचविण्यात आले आहेत. सदर बदल मूलतः लेबल Declaration व विक्री पद्धती संदर्भात आहेत. सदर सुचविलेल्या बदलांच्या अनुषंगाने, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्याकडून (FSSAI) प्राधिकरणाला अभिप्राय देण्यात आले आहेत.

-----------------

## मुंबई-पुणे प्रवासासाठी तिसऱ्या द्रुतगती महामार्गाच्या बांधकामाबाबत

**(२३) * १६१७४ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते पुणे प्रवासासाठी वाढत्या वाहनसंख्येमुळे सध्याच्या महामार्गांवरील वाहतूक कोंडी लक्षात घेऊन नवीन तिसऱ्या द्रुतगती महामार्गाच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनाकडून सादर करण्यात आला असून त्यानुसार पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर महामार्गाच्या आराखड्याचे काम माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तिसऱ्या महामार्गासाठी अंदाजे रु.४२,००० कोटी इतका खर्च अपेक्षित असून, भूसंपादन, पर्यावरणीय मंजुरी आणि निधी उपलब्धता यासंबंधी कामांमध्ये विलंब होत असल्याची तक्रार संबंधित विभागांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गाचा विस्तार अटल सेतू ते चौक आणि चौक ते पुणे या मार्गांचा समावेश करून मुंबईपर्यंत करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यातील काम सुरू असले तरी उर्वरित टप्प्यांवरील आवश्यक कार्यवाही अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या महामार्गाच्या बांधकामामुळे सध्याची वाहतूक कोंडी दूर होऊन मुंबई-पुणे प्रवास दीड तासात पूर्ण होईल, असा दावा 'एनएचएआय'कडून करण्यात आला असून या संदर्भात शासनाकडे व्यवहार्यता अहवाल, पर्यावरणीय परिणाम आणि खर्चाचे तपशील उपलब्ध करून देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या तिसऱ्या मुंबई-पुणे महामार्गाच्या अंमलबजावणीसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) ते (५) महाव्यवस्थापक (तांत्रिक) व प्रकल्प संचालक, पनवेल, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अहवालानुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कोणताही नवीन द्रुतगती मार्ग प्रस्तावित अथवा बांधण्यात आलेला नाही.

तथापि पागोटे ते चौक या दरम्यान एकूण २९.२१९ कि.मी. लांबीच्या प्रवेश नियंत्रित महामार्गाच्या (Access Controlled Highway) बांधकामास केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली असून सदर प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * १६१११ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप फाटा, टोप व नागाव फाटा या ठिकाणी उड्डाणपुलांची कामे गेल्या दोन वर्षांपासून अर्धवट असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अर्धवट कामांमुळे वाहनतळांवर मोठी गर्दी होत असून सेवा रस्त्यांवरील ताण वाढल्याने अपघातांच्या घटना वाढल्या आहेत व दररोज वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उड्डाणपुलांच्या रखडलेल्या कामामुळे नागरिक व वाहनचालकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रखडलेली कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील कागल- सातारा विभागाचे कि.मी. ५९२/२४० ते कि.मी. ७२५/००० या लांबीतील सहा पदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप फाटा, टोप व नागाव फाटा या ठिकाणी सहापदरी उड्डाणपूल बांधण्याचे काम कंत्राटदारामार्फत प्रगतीत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप फाटा, टोप व नागाव फाटा या ठिकाणच्या रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामाबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(४) व (५) कामाच्या संथ प्रगतीबाबत संबंधित कंत्राटदारास नोटिस देण्यात आलेली आहे. नागरिकांच्या मागणीनुसार करावी लागणारी अतिरिक्त कामे विचारात घेऊन प्रकल्पाची मुदत दि. ३०/४/२०२४ पर्यंत

वाढवण्यात आलेली आहे. प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने चेअरमन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत आढावा घेण्यात आलेला असून प्रकल्प निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याबाबत कंत्राटदारास सूचना देण्यात आलेल्या आहेत. कामाच्या प्रगतीमध्ये सुधारणा न झाल्यास करारनाम्यातील तरतुदीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावर पणदूर आणि वेताळबांबर्डे (ता. कुडाळ) येथील रस्त्यांवर खड्डे पडल्याबाबत

**(२५) * १५७१४ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर पणदूर व वेताळबांबर्डे (ता.कुडाळ) परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खड्ड्यांमुळे राष्ट्रीय महामार्गावर वेताळबांबर्डे येथे झालेल्या अपघातात श्रीमती रश्मी गणपत आंबडोसकर यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाच प्रकारची दुर्घटना कसाल–मालवण मार्गावरील रानबाबुळी तिठ्याजवळ घडली असून लक्झरी बस व मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात श्री गणेश चंद्रकांत घोगळे यांचा जागीच मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील दोन्ही अपघातांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी तसेच सदर अपघातांमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२), (३) व (४) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ची महाराष्ट्र राज्यातील एकूण लांबी ४७१.३० कि.मी. असून त्यापैकी कि.मी. ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि.मी. ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील, मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ची लांबी राष्ट्रीय महामार्ग (सा.बां) विभागाच्या अखत्यारीत असून अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांच्या अहवालानुसार या महामार्गावरील पणदुर व वेताळ बांबार्डे (ता. कुडाळ) परिसरात सततच्या पावसामुळे काही प्रमाणात खड्डे पडले होते व महामार्गाच्या देखभाल दुरुस्ती अंतर्गत सदरील ठिकाणचे खड्डे भरण्यात आले आहेत.

कुडाळ पोलिस ठाण्याच्या अहवालानुसार भरधाव वेगात मोटर सायकल चालविल्याने व ताबा सुटल्याने अपघात झाला आहे.

सिंधुदूर्ग नगरी पोलिस ठाण्याच्या अहवालानुसार कसाल-मालवण मार्गावरील सिमरेवाडी येथील रानबाबुळी तिठ्यापुढील मालवणकडे जाणाऱ्या रस्त्यावर लक्झरी बसने मोटार सायकलला धडक दिल्याने अपघात झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

पावसाळयाच्या कालावधीत सदर भागातील खड्डे कोल्डमिक्स पद्धतीने नियमित भरण्यात आले होते. पाऊस थांबल्यानंतर कायमस्वरूपी डांबरीकरण (Dense Bitumen Macadam) करण्यात आलेले आहे.

सदर अपघातातील मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने मोटार अपघात दावा प्राधिकरण, सिंधुदुर्ग नगरी येथे कुडाळ व सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाण्यांकडून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरपूर (जि.धुळे) शहरात भेसळयुक्त दूध विक्री होत असल्याबाबत

**(२६) * २०३६६ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर (जि.धुळे) शहरात सणासुदीच्या काळात भेसळयुक्त दुधाची विक्री केली जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भेसळयुक्त दूध उकळल्यावर रबरासारखे जाड आणि चिकट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नफा मिळवण्याच्या उद्देशाने व्यापाऱ्यांकडून रासायनिक घटक अथवा पावडरचे मिश्रण करून दूध विक्री केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ अंतर्गत दंड वाढविणे, गुन्हा अजामीनपात्र करणे, भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे इत्यादीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३) व (४)

दि.२२/१०/२०२५ रोजी प्रसारित झालेली बातमी व पोलिसांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने दि.२३/१०/२०२५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने मे. जमजम दुध डेअरी, कुंभारटेक, शिरपूर या पेढीची तपासणी करून म्हशीच्या दुधाचा अन्न नमुना विश्लेषणासाठी घेतला असुन उर्वरीत म्हशीच्या दुधाचा साठा संशयावरून जप्त करण्यात आला व तो नाशवंत असल्याने नष्ट करण्यात आला होता. अन्न विश्लेषक, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर दुधामध्ये Milk Fat ४.३ (Min ५%) आढळून आल्याने सदर नमुना कमी दर्जाचा घोषित केला आहे.

तसेच, या प्रकरणी दि.२३/१०/२०२५ रोजी पोलिसांनी करवंद, ता.शिरपूर या गावातील संबंधित महिलेकडे शिल्लक असलेल्या म्हशीच्या दुधाचा अनौपचारिक नमुना अन्न व औषध प्रशासनाकडे हस्तांतरीत केला असता सदर नमुना दि.२४/१०/२०२५ रोजी अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे विश्लेषणास्तव पाठविण्यात आलेला होता. विश्लेषण अहवालानुसार सदर दुधामध्ये Milk Fat १.२% [Minimum ५.०%] आणि Milk solid not Fat ८८.५% [Minimum ९% ] असे आढळून आलेले आहे. त्यामुळे सदर दुधसदृश्य पदार्थामध्ये पाण्याचे प्रमाण नगण्य असून दुध व्यवस्थितरित्या साठवणूक न केल्यामुळे तसेच, अयोग्य हाताळणीमुळे दुधातील

ॲसिडीटी वाढून ते त्याचे मिल्क कोॲग्युलेशन (milk coagulation) झाल्याने दुधसदृश्य पदार्थाचा रबरासारखा गोळा झाला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यानुसार, मे. जमजम दुध डेअरी, कुंभारटेक, शिरपूर या पेढीचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ६९ अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पिंपळी-खडपोली रस्त्यावरील पुल खचल्याबाबत

**(२७) * १५६७५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पिंपळी-खडपोली रस्त्यावरील पुल रात्रीच्या सुमारास खचल्यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद झाल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये महाड येथे सावित्री नदीवरील पुल कोसळल्यानंतर तसेच माहे जून, २०२५ मध्ये पुणे जिल्ह्यातील मावळ येथे झालेल्या पुल दुर्घटनेनंतर जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश विभागास देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशांनुसार पिंपळी-खडपोली-दसपटी मार्गावरील सुमारे ६० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येऊन त्यात काय निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत,

(४) असल्यास, सदर पुलाबाबत चौकशीच्या अनुषंगाने संबंधित व्यक्ती, अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुघ्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,त्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे,

(५) तसेच, खचलेला पूल पुन्हा उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आले होते.

(अ) पुलाचे दगडी बांधकामाच्या तळाशी झीज झाली आहे.

(ब) पुलाचे दगडी बांधकामाच्या कोपींगचे कॉंक्रीट खराब झाले आहे.

(क) पुलाचे ॲबटमेंट च्या जॅकेटिंगवर भेगा दिसून आल्या आहेत.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राकडे जाणाऱ्या रस्त्यावरील हा पुल असून, त्याची पुनर्बांधणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करुन देत असल्याबाबतची विनंती त्यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभागास करण्यात आली आहे. त्यानुसार सदर पुल खचण्यापुर्वीच या पुलाच्या ठिकाणी नवीन पुल बांधकामासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रत्नागिरी यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिनांक ११/०८/२०२५ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे. सबब, चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सदर पुलाच्या पुनर्बांधणीचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात अन्नधान्य पुरवठा वाहनांमधून धान्यांची चोरी होत असल्याबाबत

**(२८) * १८१९८ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि. सोलापूर ) तालुक्यात तसेच शहरात अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या वाहनांमधून धान्य चोरीचे प्रकार माहे जूनच्या शेवटच्या आठवड्यात आणि जुलै, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानाधारक सरकारी वाहनांमधून खाजगी वाहनांमध्ये अनधिकृतरीत्या धान्याची अफरातफर करून काळाबाजार करत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरव्यवहारात काही अधिकारी व मुख्य वाहतूक ठेकेदार यांच्या संगनमताचा संशय व्यक्त करून स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबतची शासनाकडे चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर शहरातील रामवाडी भागात व पंढरपूर परिसरात घडलेल्या घटनांबाबत संबंधित अन्नधान्य पुरवठा अधिकारी व मुख्य वाहतूक ठेकेदार यांची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित अधिकारी, कर्मचारी तसेच मुख्य वाहतूक ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या धान्यचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) शासकीय धान्य गोदाम, रामवाडी परिसरात माहे जून, २०२५ मध्ये अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या वाहनामधून परवानगी नसलेल्या इतर वाहनातून धान्य पुरवठा करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली होती.

दि.३०/०९/२०२५ रोजी पंढरपूर ते महुदे जाणाऱ्या रस्त्यावर थेट वाहतूक प्रतिनिधी यांनी खाजगी जागेचा वापर केल्याची बाब निदर्शनास आली होती.

(३) सदर प्रकरणांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून चौकशीची मागणी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) उपरोक्त दोन्ही प्रकरणांमध्ये जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये, संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी चौकशी चालू आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(६) अन्नधान्य वाहतूकी दरम्यान गैरव्यवहार/अफरातफर इत्यादी प्रकरणांमध्ये या विभागाच्या दि.१५/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार कारवाई करण्याबाबत विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

----------------

## मुंबईतील मुलुंड ते घाटकोपर दरम्यान पूर्व द्रुतगती मार्गावरील ७९५ झाडांची होणारी वृक्षतोड.

**(२९) * १८१५६ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड ते घाटकोपर दरम्यान पूर्व द्रुतगती मार्गावरील ७९५ झाडांची वृक्षतोड होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण तज्ञाच्या मते झाडांचे स्थलांतर केवळ कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात मात्र अनेक झाडांची वृक्षतोड होणार असून परिसरातील हरितपट्टा मोठ्या प्रमाणावर नष्ट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसारख्या महानगरात विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होवून नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम होणार असल्यामुळे पर्यावरणप्रेमींनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३),(४) व (५) अंशत: खरे आहे.

मुंबई ते ठाणे या अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तसेच मुंबई ते समृद्धी महामार्गापर्यंत विनाअडथळा वाहतूक व्यवस्था उपलब्ध करण्याठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्व मुक्तमार्गावरील छेडा नगर ते आनंदनगर, ठाणे पर्यंत पूर्व मार्ग विस्तार प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

सदर विस्तारीकरण प्रकल्प हा मुंबई–ठाणे या अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी अत्यावश्यक आहे. या प्रकल्पामुळे पूर्व द्रुतगती मार्ग व पुढे मुंबई ते समृध्दी महामार्गापर्यंत वाहतूक ताण कमी होऊन वाहन प्रवाह अधिक सुरळीत होईल, त्यामुळे दक्षिण मुंबई ते ठाणे प्रवासाचा वेळ अंदाजे २५ ते ३० मिनिटांनी कमी होण्यास मदत होईल, थांबे कमी झाल्यामुळे इंधन बचत होऊन हरितगृह वायूंचे उत्सर्जन घटेल व वायू गुणवत्तेत सुधारणा होण्यास मदत होईल, रुग्णवाहिका, अग्निशमन व पोलिस वाहने यांची प्रतिसादक्षमता वाढून आपत्कालीन सेवांना वेग प्राप्त होईल, सुधारीत कनेक्टिव्हिटीमुळे औद्योगिक व व्यावसायिक वाटचाल सुकर होऊन मुंबईचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागेल.

सदर प्रकल्पातील बाधित वृक्षांबाबत प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांद्वारे संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षणानुसार वृक्ष तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार या संरेखनात एकूण १६५२ वृक्षांपैकी ३४१ पुनर्रोपण करावयाचे वृक्ष व ३८२ वृक्ष तोडण्याबाबतचा अहवाल दि. १४/०८/२०२५ रोजी महानगरपालिकेस सादर करण्यात आला आहे. उर्वरीत ९२९ झांडांची वृक्षतोड करण्याची आवश्यकता नाही. सदर वृक्षतोडीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सूचना व हरकतीबाबत दि. १६/१०/२०२५ रोजी उद्यान अधीक्षक तथा वृक्ष अधिकारी यांच्या दालनात सुनावणी आयोजित करण्यात आली होती. याबाबत प्राप्त सूचना व हरकतींचे शंकांचे निरसन करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रकल्पांतर्गत आवश्यक त्या ठिकाणी वृक्षतोड/पुनर्लागवड करताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुमारे ७५०० नवीन वृक्षारोपण करून हरित आच्छादन वाढविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे.

-----------------

## मुरबाड व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बांधकाम विभागातील कामांमध्ये झालेली अनियमितता

**(३०)* १६४२० श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांनी मुरबाड व शहापूर तालुक्यातील जोडरस्ते, संरक्षक भिंत, रुग्णालयाचे प्रवेशद्वार व पार्किंग शेड आदी बांधकामांसाठी एकूण रु. १६ कोटी ५५ लाख १९ हजार किंमतीची कामे मंजूर केली असून, सदर कामे कंत्राटदारांना देण्यापूर्वी आवश्यक त्या निविदा प्रक्रियेविना मर्जीतील कंत्राटदारांना वाटण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान कोणत्याही अधिकृत वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द न करता निविदा स्वीकारण्यात आल्या व संबंधित वृत्तपत्रांना पेमेंट दिल्याच्या नोंदी सुद्धा शंकास्पद असल्याची बाब सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी यांच्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि. ३०/०९/२०२४ अन्वये ई-निविदा प्रसिध्दीच्या सुधारीत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या कालावधीप्रमाणे ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. यास्तव सदर प्रकरणी चौकशी तसेच चौकशीच्या अनुषंगाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत

**(३१) * १६०३३ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन मते (नागपूर**

**दक्षिण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व शहरी भागात विशेषत: पुणे, नागपूर, कल्याण डोंबिवली, मुंबई येथे भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सहा वर्षांत तब्बल ३० लाख नागरिकांना कुत्रा चावण्याच्या घटना तसेच सन २०२१ ते २०२३ मध्ये ३० व्यक्तींचा कुत्र्यांनी चावा घेतल्याने रेबीज या आजारामुळे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राणी जन्म नियंत्रण आणि रेबीज लसीकरण लागू करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा.महानगरपालिका) निधी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणे, मोकाट कुत्र्यांवर नसबंदी व लसीकरण करण्यासदंर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांना मा. सर्वोच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील भटक्या कुत्र्यांच्या संख्या कमी करणे, निर्बीजीकरण व रेबीज लसीकरण कार्यक्रम प्रभावीपणे करणे, आजतागत झालेल्या मृत्यूबाबत पीडितांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दि.२४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक दि.२७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, केंद्र शासनाच्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.२० मार्च, २०२५ अन्वये तर राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्राम विकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथील बिझनेस सेंटर
## या काचेच्या इमारतीला लागलेली आग

**(३२) * १५७५१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरीमधील बिझनेस सेंटर या काचेच्या इमारतीला लागलेली आग विझविताना अग्निशमन दलाची मोठी दमछाक झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेनंतर काचेची तावदाने असलेल्या बहुमजली इमारतींचा अग्निसुरक्षेचा मुद्दा पुढे आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काचेच्या इमारतीमध्ये वायुवीजन (व्हेंटीलेशन) अभावी आग विझवताना धुरात कोंडून त्यातून जिवीतहानी होण्याची शक्यता मोठया प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाच्या चौकशीन्वये काचेच्या इमारतींमध्ये अग्निसुरक्षेसंदर्भात यंत्रणा सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सदर इमारतीमधील आग ही लेवल ३ इतक्या तीव्रतेची होती. तीन ते साडेतीन तासामध्ये पूर्णपणे आग आटोक्यात आणून नंतर ती आग विझविण्यात आली.

(२) हे खरे नाही.

सदर बहुमजली इमारतीमध्ये विविध कार्यालये गोदामे व दुकाने असून त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील सामानांचा साठा असल्याकारणांने व सदर इमारतीचा जिना व इलेक्ट्रिक ड्क्ट बंदिस्त नसल्या कारणाने आगीचा प्रसार उर्ध्व दिशेने व झपाटाने झाला. आगीच्या तीव्रता व दाहसकतेमुळे इमारतीच्या काचेची तावदाने फुटून मोकळया हवेच्या प्रवाहाने नऊ ते तेरा माळयापर्यंत आग सर्वत्र पसरली त्याचप्रमाणे इमारती खाली उभे असलेल्या वाहनांना देखील आग लागण्याचा प्रकार घडला.

(३) होय हे खरे आहे.

काचेच्या तवादाने असलेल्या इमारतींमध्ये योग्य प्रमाणात व्हेंटीलेशन न झाल्यास धूर मोठ्या प्रमाणामध्ये साठून गुदमरून जिवितहानी होण्याची शक्यता असते.

(४) याबाबत मुंबई अग्निशमन दलामार्फत काचेच्या तावदान असलेल्या इमारतींकरिता मुंबई अग्निशमन दल नित्य परिपत्रक क्र. ६१ दि. २९/०९/२०१६ अन्वये मार्गदर्शक सुचना जारी केलेली आहेत. तसेच अग्निसुरक्षे संदर्भात उपाययोजना DCPR २०३४ मध्ये याबाबत नमुद केले आहे. तसेच इमारत निर्माण करताना त्याचे पालन केले जाते.

(५) प्रश्न उदभवत नाही.

----------------

## शेतकऱ्यांची भात खरेदीसाठी घेतलेली बारदाणे गहाळ झाल्याबाबत

**(३३) * १६६११ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाकडे सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत बारदान उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांकडून बारदानासह भात खरेदी करण्यात आल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर व मुरबाड तालुक्यातील दुधनोली, अघई, मढ-अंबर्ले व खर्डी केंद्रांतर्गत येणाऱ्या गोदामात सुमारे एक कोटी दहा लाख रुपये किंमतीचे ३,३८,४४७ नग बारदान कंत्राटदाराकडून घेण्यात आले असून त्यातील ८० लाख ८५ हजार ९३७ रुपयांचे २,४७,९३७ नग बारदान गहाळ असल्याचे लेखापालांच्या चौकशीत उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीमध्ये तत्कालीन उपप्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक तसेच बारदान पुरवठादार यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आलेला असून शासनामार्फत याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सनदी लेखापाल यांनी केलेल्या तपासणीनुसार सुगवे, किन्हवली, धसई, खोर, अघई व खर्डी या खरेदी केंद्रावर मिळून एकूण २,८७,२९९ नग इतक्या बारदानाचा अपहार झालेला असून सदर बारदान्याची किंमत रु. १,०५,९१,५६५,०५ /- इतकी आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सनदी लेखापाल यांनी केलेल्या तपासणीनुसार खरेदी केंद्रावर बारदाना अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने आदिवासी विकास महामंडळामार्फत दि.२३.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी समितीने दि. २६.०९.२०२५ रोजी महामंडळास अहवाल सादर केला आहे.

(४) भातसानगर, बाभळे व सावरोली येथे झालेल्या बारदाना अपहाराप्रकरणी संबंधित गोदामपाल यांचेविरुध्द किन्हवली व शहापूर पोलीस स्टेशन येथे अनुक्रमे प्रथम खबर क्रमांक ००६/२०२५ आणि प्रथम खबर क्रमांक ००१८/२०२५ दि. १४.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौकशी समितीने आदिवासी विकास महामंडळास सादर केलेल्या अहवालानुसार महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी दोषी असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. प्राप्त खुलाशांच्या अनुषंगाने जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकिय कारवाई करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## कल्याण (पूर्व) येथील अनेक भागात पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत

**(३४) * १६८१९ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अमृत योजनेअंतर्गत ३५७ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेमध्ये २७ गावांचा समावेश व १०५ दलघमी साठवण क्षमतेची तरतूद असून सदर योजना माहे एप्रिल, २०२५ मध्ये पूर्ण करण्याचे आश्वासन असतानाही काम संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी यापूर्वीच या भागात पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत आयुक्त तथा प्रशासक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे दिनांक २५ जून, २०२५ रोजी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण पूर्वेतील विशेषत: चिंचपाडा, आशेळे, माणेरे,द्वारली,नांदिवली व वसार या परिसरामध्ये अनेक भागात पाणी पुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असल्याने नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू परिसरातील कमी दाबाने होत असलेल्या पाणी पुरवठयाबाबत शासनाने चौकशी अथवा पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५)असल्यास, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी अमृत योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या रुपये ३५७.१६ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सदर २७ गावांसाठी प्रतिदिन १०५ दललि इतके पाणी आरक्षण मंजूर असून मनपास अंदाजे ६० ते ६५ दललि इतका अपुरा पाणीपुरवठा होत आहे.

तसेच, नदीत गाळ येणे, पंप बंद पडणे, वीज पुरवठा खंडित होणे इत्यादि विविध कारणांमुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणीपुरवठा अपुरा, कमी दाबाने व विस्कळीत स्वरूपात होत असतो यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावे क्षेत्रात चिंचपाडा, आशेळे, माणेरे, द्वारली, नांदीवली, वसार इ. भागात पाणी टंचाई जाणवत आहे व याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे ही वस्तुस्थिती आहे.

सद्यस्थितीस सदरील प्रकल्पाची ७५.५० % भौतिक प्रगती झाली असून प्रकल्पाचे काम मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे. तसेच, ठेकेदाराच्या संथ कामाच्या गतीमुळे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ पासून दंडाची महानगरपालिकेने आकारणी केली असून सदरील दंड चालू देयकातून वसूल करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

----------------

## मनोर- वाडा व भिवंडी (जि.पालघर) महामार्गाच्या दूरवस्थेमुळे अपघातांमध्ये झालेली वाढ

**(३५) * १७४१८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर–वाडा–भिवंडी महामार्गाची मागील १५ वर्षांपासून अत्यंत दुर्दशा झाली असून या महामार्गावर झालेल्या विविध अपघातांमध्ये शेकडो नागरिकांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाच्या दुरुस्ती व काँक्रीटीकरणाचे सुमारे रुपये ८०० कोटींचे काम एका कंत्राटदारास देण्यात आले असून ते काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गावरील कामातील विलंब व अपघातांच्या वाढत्या घटनांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदार व संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासनाने मनोर वाडा रस्त्याचे राज्यमार्ग क्र.३४ (कि.मी. २९/५५० ते ५३/८०० आणि वाडा-भिवंडी रोडचे) राज्यमार्ग क्र. ३५ (कि.मी. ४९/००० ते कि.मी. ८९/७०० सुधारणा करणे.) ता. भिवंडी जि. ठाणे या रस्त्याच्या कामास शासनाने रु.१०४२.६० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता दिली असून, कंत्राटदारास दिनांक १५/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. काम पूर्ण करण्याची मुदत ३० महिन्यांची म्हणजेच दिनांक १४/०४/२०२७ पर्यंत आहे.

रस्त्याच्या लगतच असणाऱ्या भुमीगत विदयुत वाहिन्या, JNPT सारख्या बंदरातुन मोठया प्रमाणावर होणारी अवजड वाहतुक व २०२५ चा लांबलेला पावसाळा यामुळे कामाची गती कमी झाली होती. तथापि, आता कामास गती देण्यात आली असून, काम दिलेल्या मुदतीतच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कंत्राटदारामार्फत ८.०० कि.मी. रस्त्याचे दुपदरी काँक्रिटीकरण पुर्ण करुन रस्ता वाहतुकीस खुला झाला असून, उर्वरित रस्ता कंत्राटदारामार्फत सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील राणीच्या बागेत साफसफाईच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * १५७६१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वीर माता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालय म्हणजेच राणीच्या बागेच्या साफसफाईसाठी पाच वर्षात तब्बल २७ कोटी ११ लाख ९ हजार रुपये इतका खर्च झाल्याची माहिती माहे सप्टेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीआय कार्यकर्ते श्री. एजदि फरोख मोतीवाला यांनी या खर्चावर आक्षेप घेतला असून यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे सदर खर्चाच्या चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महानगरपालिकेद्वारे पुढील बाबींचा समावेश करून एकच निविदा काढण्यात आली. कामे पुढीलप्रमाणे

(१) प्राणिसंग्रहालयाचे प्रवेशद्वार व सभोवतालचा संपूर्ण परिसराची, वाहनतळ व रस्त्यांची, कार्यालयाची, सार्वजनिक प्रसाधन गृहांची, कार्यालयातील प्रसाधन गृहांची, प्राण्यांच्या इस्पितळ व किचन कॉम्प्लेक्सची, 3डी प्रेक्षागृहाची, प्राणिसंग्रहालयातील तसेच कार्यालयातील सर्व पाण्याच्या टाक्यांची, विविध ठिकाणी बसवलेल्या बैठक व्यवस्थांची, माळी चौक्यांची, सुरक्षा रक्षक कार्यालयाची, विविध प्राणीप्रदर्शनी व प्राणी पिंजऱ्याची साफसफाई.

(२) मनुष्यबळ पुरवठा,

(३) रस्त्यांच्या आजूबाजूला असलेले इलेक्ट्रीक पोल, दिशा दर्शक व माहिती देणारे बोर्ड.

(४) गांडूळखत निर्मिती प्रकल्पाकरीता तसेच प्रणिपालकरीता मनुष्यबळ.

(५) सुरक्षा रक्षक

(६) दोन प्राणी प्रदर्शनी

(७) जीवशास्त्रज्ञ उपलब्धता.

(२) हे खरे नाही.

अशी तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.